REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ | पुणें. बुधवार तारीख ५ मे, १९४८ | अंक १७


## दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

हेड ऑफिसः—पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, ओझर ( जि. नाशिक ), खोपोली पे ऑफिसः

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल ... | रु. ७,९३,८१० |
| वसूल झालेलें भांडवल ... | रु. ३,९६,१४५ |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ५५ लाखांचेवर |

चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B. (वकील)

- गतवर्षी ऑर्डिनरी शेअर्सवर चार टक्के अधिक अर्धा टक्का करमाफ डिव्हिडंड दिलें.
- मुंबई, नगर, नाशिक, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे ठिकाणीं डिमांड ड्राफ्टस् दिले जातात.
- बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एन. एन. क्षीरसागर,
आर. बी. साळवेकर,
बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.

## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना-१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. ४८३ | " Cencobank " | नं. ५११ |

मुख्य कचेरीः—लक्ष्मी रोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुरामभाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातातः—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

कार्ड पाठवून व्ही. पी. नें मागवा रक्तवर्धक खुराक **आंबावडी** फडके प्रॉडक्टस् नागनाथ पार, पुणें.

**नं. २० साबण** बार सोप आणि वडी वापरा
माणिक सोप वर्क्स, कराड ( जि. सातारा )

वर्कशॉप मशिनरी (२)
हेवी ड्यूटी
शिमोगा लेथ
(८″—१०″)
संपूर्ण देशी, पहिल्या प्रतीचा, तज्ज्ञांचे देखरेखीखालीं कुशल कारागिरांनीं अद्यावत् साधनांनीं बनविलेला
— चौकशी स्थान —
केळकर बंधु, बुधवार चौक, पुणें २.

## विविध माहिती

**सांगली बँकेची मुंबईतील शाखा**—सांगली बँकेच्या मुंबई शाखेची कचेरी दलाल स्ट्रीट, मुंबई येथून हलवून रिझर्व्ह बँकेच्या मागें असलेल्या बँकेच्या स्वतःच्या इमारतींत नेण्यांत आली आहे. बँकेच्या शाखेचा नवा पत्ता बझार गेट स्ट्रीट, फोर्ट, मुंबई असा आहे.

**तांदुळावर जादा जकात**—सिंधमधून पश्चिम पंजाबांत निर्यात करण्यांत येणाऱ्या प्रत्येक मण तांदुळावर दीड रुपया जादा जकात घेण्याची परवानगी पाकिस्तान सरकारनें सिंध सरकारला दिल्याचें समजतें. सिंधमधील तांदुळाचा काळा बाजार व चढत्या किंमती ह्यांना आळा घालण्यासाठी ही जादा जकात घेण्यांत येणार आहे.

**भातकल बंदरासाठी वाटाघाटी**—भातकल बंदराची सुधारणा व विकास करण्यासाठी म्हैसूरचें सरकार मध्यवर्ती हिंदी सरकारशीं वाटाघाटी सुरू करणार आहे असें समजतें. त्याच प्रमाणें बंगलोर शहर लष्करी ठाण्याच्या दृष्टीनें सुसज्ज करण्यासाठी हिंदी सरकारला परत देण्याची तयारीही म्हैसूर सरकारनें दाखविली आहे.

**बी. एस्. ए. सायकलींची मागणी**—हिंदुस्थानांतून २५ हजार बी. एस्. ए. बनावटीच्या सायकलींची मागणी त्या कारखान्याकडे करण्यांत आली आहे. त्यांची किंमत सुमारें ३ लाख रुपये होईल. ह्या कारखान्याकडून हिंदुस्थानला दरवर्षी ५० हजार सायकली मिळूं शकतील असा अंदाज आहे. शिकारीचा शोक असणारांसाठी बंदुकाही ह्या कारखान्याकडून लौकरच मिळतील.

**आसाम प्रांताला विमानानें कापड**—आसाम प्रांतांत कापडाची टंचाई निर्माण झाली तर परप्रांतांतून विमानानें कापड आयात करण्याची व्यवस्था प्रांतिक सरकारनें केली आहे. गौहत्ती शहरांत कलकत्त्याहून विमानानें कांहीं कापड आणण्यास प्रारंभही झाला आहे.

**पौंडी शिलकेचा अवघड प्रश्न**—पाकिस्तान सरकारच्या विनंतीला मान देऊन, पौंडी शिलकेसंबंधीं लंडनमध्यें मे महिन्यांत होणाऱ्या वाटाघाटी जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पुढें ढकलण्यांत आल्या आहेत. मे महिन्यांत पाकिस्तान घटना-समितीच्या महत्त्वाच्या बैठका असल्यामुळें वाटाघाटींना विलंब लागत आहे. आतांपर्यंत सहा, सहा महिन्यांचे करार करून कांहीं पौंडी शिल्लक हिंदुस्थानसाठी खुली करण्यांत आली होती. परंतु, ह्यापुढें निदान कांहीं वर्षांचा करार तरी करावा अशी मागणी पाकिस्तान व हिंदुस्थान ह्या दोन्ही सरकारांतर्फें करण्यांत येईल असें म्हणतात. हिंदुस्थानतर्फें जाणाऱ्या प्रतिनिधी मंडळांत फडणवीस श्री. षण्मुखम् चेट्टी आणि रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर सर चिंतामण देशमुख हे प्रमुख आहेत.

**मोटार वहातुकीचें राष्ट्रीयीकरण**—पुणें-अहमदनगर ह्या रस्त्यावरील राष्ट्रीयीकरण करण्यांत आलेली मोटार वहातूक जून, १९४८ पासून सुरू होणार आहे. ह्या धंद्यांत काम करीत असलेल्या लोकांनाच कामावर घेण्याचें सरकारचें धोरण आहे. तेव्हां सध्याच्या कामगार, कारकून, यंत्रज्ञ इत्यादि लोकांनीं आपलीं नांवें रिजनल ट्रॅन्सपोर्ट ऑफिसर, पुणें ह्यांच्या कचेरींत नोंदवून ठेवावीं असें जाहीर करण्यांत आलें आहे.

**पाकिस्तानमधून येणाऱ्या कापसावरील जकात**—ता. १ मार्च, १९४८ पासून पाकिस्तान परकीय राष्ट्र ठरविलें गेल्यामुळें पाकिस्तानांतून हिंदुस्थानांत आयात होणाऱ्या दर पौंड कापसावर २ आणे आयात कर द्यावा लागत असे. ह्या आयात-जकातीमुळें हिंदी कापसाच्या व कापडाच्या किंमती वाढण्याचा संभव लक्षांत घेऊन ता. ३१ ऑगस्ट, १९४८ पर्यंत पाकिस्तानांतून आयात होणाऱ्या कापसावरील जकात हिंद सरकारनें रद्द केली आहे.

**रशिआचा सुवर्णसंचय**—१९४८ सालीं अमेरिका सोडून रशिआ ह्या एकाच राष्ट्रानें आपल्या सोन्याच्या सांठ्यांत भर घातली आहे. चालू वर्षाच्या प्रारंभीं रशिआजवळ २५७ कोटी डॉलर्सचा सोन्याचा सांठा होता. १९४७ सालीं १७ कोटी लक्ष डॉलर्सच्या किंमतीचा सोन्याचा सांठा रशिआनें केला. गेल्या वर्षी अर्जेंटायनामधून सर्वांत अधिक सोनें परदेशीं रवाना झालें.

**कॉलऱ्यावर नवें औषध**—डॉ. भाटनगर ह्यांनीं कॉलऱ्यावर एक नवीन औषध शोधून काढलें आहे. ह्या औषधाला तूर्त '६२५७' असें नांव देण्यांत आलें असून, त्याच्या उपयोगानें कॉलऱ्याचा प्रसार थांबवितां येतो आणि कॉलरा झालेल्या माणसाचा बचावही करतां येतो. ह्या औषधाचे प्रयोग मद्रास प्रांतांतील तंजावर जिल्ह्यांत करण्यांत आले असून ते यशस्वी झाले आहेत असें समजतें.

**हिंदुस्थान व पेट्रोल**—पेट्रोल व त्यापासून बनविलेल्या वस्तू ह्यांचा तुटवडा सध्या हिंदुस्थानला फार जाणवत आहे. पेट्रोलची वाटप-पद्धति अंमलांत येण्यापूर्वी हिंदुस्थानला दरवर्षी ४० लाख टन पेट्रोल लागत असें. वाटप-पद्धतीमुळें हा खप ३० लाख टनांवर आणता आला असला तरी इतकेंही तेल दरवर्षी मिळविणें हिंदुस्थानला कठीण जाणार आहे. आपल्या गरजेच्या फक्त ५ टक्के तेलच हिंदुस्थान निर्माण करूं शकतो. इराणच्या आखाताच्या प्रदेशांतील तेल ब्रिटिश व अमेरिकन कंपन्या उपशीत आहेत. ब्रह्मदेशांतून क्रूड ऑईल आणून तें हिंदुस्थानांत शुद्ध करावें अशी एक कल्पना काढण्यांत आली होती. परंतु, ब्रह्मदेशांतील तेलाच्या खाणी १९५१ पर्यंत चालू होऊं शकत नाहींत हें एक; आणि हिंदुस्थानांत तेल शुद्ध करण्याचे कारखाने आज नाहींत हें दुसरें. अशा परिस्थितींत तेलाची वाढती गरज भागविणें कठीण असलें तरी हिंदुस्थान सरकार त्या दिशेनें प्रयत्न करीत आहे.

**मासिकांचे अमेरिकन भोक्ते**—मासिकें वाचणाऱ्या अमेरिकन वाचकांची अंकडेशास्त्रीय पहाणी नुकतीच करण्यांत आली. तींत असें आढळून आलें कीं ७ कोटी, १५ लाख किंवा १५ वर्षांपुढील दोन तृतीयांश लोकसंख्या मासिकें वाचणारी आहे. वाचकांपैकी ५०·४ टक्के स्त्रिया व ४२·६ टक्के पुरुष असें प्रमाण आढळून आलें. २२·७ टक्के लोक ६ पेक्षा अधिक मासिकें वाचतात व १८·५ टक्के वाचक फक्त एकच मासिक वाचतात.

-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ, दमडेरे चोळाजवळ, पुणें २

# अर्थ

बुधवार, ता. ५ मे १९४८



प्रो. वा. गो. काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## मूलग्राही महत्त्वाच्या कारखान्याची स्थापना

### वाया जाणारीं हाडें सत्कारणीं लागणार

स्वतंत्र बुद्धीचे, निरलस व कल्पक म्हणून प्रसिद्ध असलेले, पुणें येथील बालोद्यान प्रेसचे श्री. बाबुराव सहस्रबुद्धे ह्यांनीं छापखान्याचे व्यवसायांत किती नव्या गोष्टी आणल्या ह्याची सर्वांस माहिती आहेच. त्याखेरीज ग्लू, जिलेटीन, फोटोग्राफिक सेनसिटिव्ह प्लेटस व कागद, रोलर कॉंपोझिशन, फोटो एनग्रेव्हिंग ग्लू, इत्यादींच्या उत्पादनाचा त्यांना २५ वर्षांचा अनुभव आहे. त्यांनीं युरोपचा दोनदां प्रवास केलेला आहे आणि आधुनिक उत्पादनपद्धतीचा चिकित्सापूर्वक अभ्यास केलेला आहे. चार वर्षांपूर्वी छापखान्याचा धंदा आपल्या मुलांच्या स्वाधीन करून ते त्यांतून निवृत्त झाले व जिलेटीनच्या धंद्याच्या उभारणीसाठीं त्यांनीं प्रयत्न सुरू केला. १९४२ सालीं पुणें येथें मीट डी हैड्रेशन फॅक्टरीची उभारणी सुरू झाली, तेव्हांपासूनच वायां जाणाऱ्या हाडांनीं त्यांचें लक्ष वेधून घेतलें आणि दि हडपसर केमिकल्स अँड बाय-प्रॉडक्ट्स लि. ही कंपनी नुकतीच नोंदवून श्री. सहस्रबुद्धे ह्यांनीं आतां आपल्या तपश्चर्येस मूर्त स्वरूप दिलें आहे. जनावरांचीं हाडें इत्यादींपासून एडिबल जिलेटिन, ग्लू, बोनमील, बोनसुपर्स व फॉस्फेटस, आणि ॲसिडस् वगैरेचें उत्पादन करणें हा कंपनीचा प्रमुख उद्देश आहे.

सध्या वायां जात असलेलीं किंवा निर्गत होत असलेलीं हाडें कारणीं लावून त्यापासून फॉस्फेट खतें तयार करणें आणि हिंदी शेतीचें उत्पादन वाढविणें, हा श्री. सहस्रबुद्धे ह्यांचा मूळ उद्देश. ग्लू, टॅलो आणि जिलेटिन हे उपपदार्थहि उपयोगांत आणून स्वतंत्रपणें विकले, तर फॉस्फेट खतांची उत्पादनाची किंमत फारच उतरूं शकेल. सल्फ्यूरिक ॲसिड प्लँट टाकल्यानें तर अतिशयच मौलिक पदार्थांची भर पडेल. ह्या सर्व दृष्टींनींच हडपसर कंपनीची उभारणी करण्यांत येत आहे. एकाद्या देशाची भरभराट, त्या देशांतील सल्फ्यूरिक ॲसिडच्या खपावरून मोजतां येते आणि ग्लू व जिलेटिन ह्यांच्या मागणीवरूनहि त्या देशाची प्रगति अजमावतां येते, असें कित्येक वेळा म्हटलें जातें. जर्मन सरकारनें तर देशांतील सर्व हाडांचा सक्तीनें औद्योगिक उपयोग करावयास लावला होता. हिंदुस्थानांतील हाडांची निर्गत दीर्घ काळ चालू आहे ती थांबवून फॉस्फेट खतें ठिकठिकाणीं तयार करविण्याचें महत्त्व हिंदुस्थानाच्या आजच्या अन्नपरिस्थितींत तरी पटवून देण्याचें कारण नाहीं.

हाडांचें रासायनिक पृथक्करण केलें असतां, खालीलप्रमाणें द्रव्यें मिळतातः—

| | |
|---|---|
| फॅटस व ग्रीज | १२·५० |
| ग्लू व जिलेटीन | २१·५० |
| फॉस्फेटस | ४८·०० |
| कॅलशियम कार्बोनेट्स | ३·०० |
| सिलिका व अल्कली क्षार | २·५० |
| पाणी | १२·५० |
| | १००·०० |

मुंबई प्रांतांत दरसाल सुमारें २०,००० टन हाडें मिळूं शकतील. १९३७ सालीं हिंदुस्थानांतून ७६,२१८ टन हाडें व इतर तत्सम पदार्थ निर्गत झाले, त्यांची किंमत ६० लक्ष रु. भरली. ह्याच मुदतींत ५४ लक्ष रुपये किंमतीच्या ग्लू, जिलेटिन, टॅलो, सुपर-फॉस्फेटस आणि अमोनिया फॉस्फेटस ह्यांची आयात झाली. ह्यावरून, ह्या कच्च्या मालाचें पक्क्या मालांत रूपांतर करण्यास किती वाव आहे, ह्याची कल्पना येईल. श्री. सहस्रबुद्धे ह्यांनीं ह्या धंद्याचें महत्त्व सतत प्रयत्नांनीं हिंदुस्थान व मुंबई सरकारास पटवून दिलें आहे आणि त्यांनीं श्री. सहस्रबुद्धे ह्यांच्या उपक्रमास अनेक सवलती आणि प्रत्यक्ष सहाय दिलें आहे व आणखी देऊं केलें आहे. हडपसर केमिकल्स अँड बाय-प्रॉडक्टस लि. ही कंपनी स्थापन होण्यापूर्वीच उत्पादनास आवश्यक तें प्राथमिक कार्य पुरें झालें आहे. कंपनीचा प्रॉस्पेक्टस बाहेर लवकरच पडेल तेव्हां तिच्यासंबंधीं लौकिक माहिती लोकांस समजून येईलच. तूर्त, आम्हीं कंपनीच्या स्थापनेचें स्वागत करतों. स्वतंत्र हिंदुस्थानास कोणत्या प्रकारच्या उत्पादनाची व उपक्रमाची तातडीनें आवश्यकता आहे, असें कोणी विचारलें तर श्री. सहस्रबुद्धे ह्यांच्या उपक्रमाचा तात्काळ उल्लेख करावा लागेल.

कंपनीची माहिती थोडक्यांत खालीलप्रमाणें आहे. तिचें अधिकृत भांडवल २० लक्ष रु. असून तें ऑर्डिनरी व ५% रि. क्यु. प्रेफरन्स भागांत विभागलेलें आहे. मेसर्स सहस्रबुद्धे आणि कंपनीकडे मॅनेजिंग एजन्सी राहील. पुण्याजवळ हडपसर येथें कारखान्याच्या उभारणीचें काम गेले कित्येक महिने चालू आहे आणि त्यास आवश्यक ती मदत व सवलती सरकारकडून मिळालेल्या आहेत. कंपनीला डायरेक्टर्सहि चांगले लाभले असून, शेअर विक्री लवकरच सुरू होईल. मूलग्राही महत्त्वाचा असा कारखाना काढण्यांत श्री. सहस्रबुद्धे ह्यांनीं दाखविलेली स्वतंत्रबुद्धी व चिकाटी ह्यांचें चीज होईल, अशी खात्री वाटते.

---

**दि प्रोग्रेसिव्ह ॲग्रि. इंडस्ट्रीज लि., पुणें**—ह्या कंपनीनें गेल्या आठवड्यांत कमेन्समेंट सर्टिफिकेट मिळविलें असून प्रत्यक्ष कामास प्रारंभ केला आहे. शास्त्रीय पद्धतीनें मोठ्या प्रमाणावर शेतीचा धंदा व साखर करण्यासाठीं डॉ. गु. पु. फडके ह्यांच्या अध्यक्षतेखालीं ही कंपनी स्थापन झालेली आहे.

**दि डेक्कन ॲग्रि. इंडस्ट्रीज लि., पुणें**—या कंपनीच्या मॅनेजिंग एजन्सीमध्यें बदल झाला आहे; मेसर्स चिवटे, मुतालिक आणि कं. ऐवजीं ह्यापुढें डब्ल्यु. एल. डहाणूकर आणि कं. हिचेकडे मॅनेजिंग एजन्सी रहाणार आहे, असें समजतें.

---

## कै. काकासाहेब लिमये

ज्ञानप्रकाशचे माजी संपादक व भारतसेवक समाजाचे सदस्य श्री. काकासाहेब लिमये हे गेल्या आठवड्यांत निवर्तले, हें नमूद करण्यास दुःख होतें. आर्थिक व सहकारविषयक प्रश्नांस ज्ञानप्रकाश-मध्यें त्यांनीं स्थान देऊन त्यावेळींहि त्यांचें महत्त्व प्रतिपादिलें होतें.

## ब्रिटनच्या अंदाजपत्रकाचें वैशिष्ट्य

### आर्थिक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न

सर स्टॅफोर्ड क्रिप्स ह्यांनीं तयार केलेलें चालू वर्षाचें ब्रिटनचें बजेट विचारांना चालना देणारें आहे. राजकारण व अर्थशास्त्र यांची सांगड घालण्याचा प्रयत्न त्यांत दिसत असून सामान्य जनतेला समाधानी ठेवण्याची योजना साधून भांडवलदार वर्गा-वरहि जाचक कर-योजना लादलेली नाहीं. पुढील वर्षी एकंदर शिल्लक ३३ कोटी पौंड रहाणार आहे. करांपासून जमा होणारें उत्पन्न व भांवढली जमाखर्च ह्या दोनहि बाबी विचारांत घेऊन बजेटांतील शिल्लक आकारली गेली आहे. चलनविस्तार कमी करण्यासाठी सरकार-प्रेरित लहान रकमांची बचत दरआठवड्याला सुमारें १ कोटी पौंड होईल अशी अपेक्षा आहे. परंतु ह्या मुद्यावर बजेटावरील भाषणांत क्रिप्स ह्यांनीं भर दिलेला नाहीं. त्यांची बरी-चशी भिस्त भांडवलावर लादण्यांत येणाऱ्या करपट्टीवर आहे. त्या भांडवलावरील करपट्टीमुळें तिजोरींत पैसा परत येऊन, चलन-विस्तारालाहि आळा बसेल.

सामान्य इंग्रज नागरिकाला क्रिप्स ह्यांच्या अंदाजपत्रकांत पुढील आशास्थळें आढळतात. प्रत्यक्ष करांच्या जाचांतून पुष्कळांची मुक्तता झाली आहे. मजूर सरकार अधिकारारूढ झाल्यापासून अद्यापपर्यंत सामान्य नागरिकाला प्रत्यक्ष करांत सुमारें ५८ कोटी पौंडांची सूट मिळाली ही लहानसहान गोष्ट नव्हे. लष्करावरील खर्चहि ७० कोटी पौंडांनीं कमी करण्यांत आला आहे. युद्धोत्तर काळांत ब्रिटनची जमा आणि खर्च प्रत्येकीं अंदाजीं २०० कोटी पौंडांच्या आसपास असेल असा अंदाज मजूर पक्षाच्या पुढाऱ्यांचा होता. परंतु हा अंदाज मात्र सपशेल चुकला आहे असें म्हणावें लागतें. कारण, पुढील वर्षाचें अंदाजी उत्पन्न ३७६ कोटी पौंड आहे. यावरून चलनविस्तार-निर्मित परिस्थि-तीची कल्पना येते. वरील अंदाजी उत्पन्नाच्या चारपट ब्रिटनचें वार्षिक राष्ट्रीय उत्पन्न आहे. तेव्हां राष्ट्रीय वार्षिक उत्पन्नाच्या एक चतुर्थांश सरकारी करांचें उत्पन्न आहे हें लक्षांत घेतलें असतां, ब्रिटिश जनतेला करांची कमाल मर्यादा सहन करावी लागत आहे व यापेक्षां जास्त कर-भार जनता सहन करूं शकणार नाहीं असा एक तर्क निघतो.

१९४८ अखेर निर्यात, युद्ध-पूर्वीच्या मानानें १५० टक्के करणें हा सरकारी प्रयत्नांचा उद्देश आहे. निर्यातीचें प्रमाण आजच सुमारें १२८ टक्के साध्य झालें आहे. ही निर्यात शक्य करण्यासाठी किंमती व नफा ह्यांचें प्रमाण हळू हळू उतरविलें पाहिजे. आठव-ड्याचे कामाचे तास फार तर ४५ असतांना, निर्गतीचें ध्येय साधतां येईल का, अशी शंका कांहीं ठिकाणीं व्यक्त करण्यांत येते. परंतु सरकारची भिस्त जनतेच्या स्वयंप्रेरणेवर व कर्तव्यनिष्ठेवर असावी असें दिसतें. कारण, परिस्थितीचें वडपण लक्षांत घेऊन सामान्य मजुरांनीं व कामगारांनीं उत्पादनाला मदत करून निर्गतीचें उद्दिष्ट गांठावें अशी अपेक्षा दिसते. चलनविस्ताराला आळा घालून, काम करण्याला व उत्पादनांत भर घालावयाला सामान्य नागरि-काला प्रोत्साहन देणें, हा बजेटावरून व्यक्त होणाऱ्या सरकारी धोरणाचा एक महत्त्वाचा भाग आहे. यंदाच्या बजेटांतील कर-योजनेनें पुढील प्रकारच्या सवलती मिळालेल्या आहेत. कमी उत्पन्न असणारांना निरनिराळ्या प्रकारांनीं सवलती मिळाल्या आहेत. प्राप्तीवरील कर-माफीची किमान मर्यादा आतां वाढविण्यांत आली आहे. वार्षिक प्राप्ति १०० पौंड असणारांवर कर होता तो आतां ४०० पौंड प्राप्ति असणारांवर आकारण्यांत येईल. विक्रीकराला लागू असणाऱ्या बाबींची पुनर्रचना करण्यांत आल्यामुळें सामान्य परिस्थितींतील नागरिकांचा थोडासा फायदा होणार आहे. वेतन व किंमती स्थिर राहिल्यामुळें बरेच जणांचा, विशेषतः आठवड्याच्या पगारावर अवलंबून असणारांचा, थोडासा फायदा होणें शक्य आहे. रेल्वेच्या शेअरहोल्डर्सचें ३ टक्के उत्पन्न कायम रहाणार आहे. सरकारी कर्जरोख्यांचा बाजारभाव व व्याजाचा दर स्थिर राखला जावयाचा आहे. नवीन भांडवल गुंतविणारांना एक आमीष ठेवण्यांत आलें आहे. तें असें कीं, व्याजावर कोणत्याहि तऱ्हेचें नियंत्रण राहाणार नाहीं, यामुळें पैसेवाले लोक भांडवलांत पैसा गुंतवूं शकतील. याप्रमाणें कामगार वर्ग, मध्यम वर्ग व कारखानदार किंवा भांडवलदार वर्ग त्या प्रत्येक गटांतील लोकांना बजेटमध्यें थोडीशी सवलत दाखविण्यांत आली आहे. त्या सवलतीनें सर्वांचा विश्वास संपादिला जाईल, त्यामुळें उत्पादनाला चालना मिळेल व ब्रिटनच्या आर्थिक जीवनाची जी सर्व मदार निर्यातीचा उच्चांक गांठण्यावर आहे ती परिस्थिति साध्य करणें शक्य होईल, असा सर स्टॅफोर्ड क्रिप्स यांचा अंदाज दिसतो.

याप्रमाणें वास्तवतेच्या भूमिकेवरून परिस्थितीला तोंड देण्याचा प्रयत्न ब्रिटनच्या बजेटमध्यें स्पष्ट दिसतो. सर्वसाधारण जनतेला स्थिरवृत्तीनें जगावयास मदत करून तिच्या सहकारितेनें उत्पादना-वर अवलंबून असणारी निर्यातीची मोहीम यशस्वी करून दाख-वावयाची आहे. असा सरळ प्रयत्न बजेटमध्यें दिसत असल्यामुळें हें अंदाजपत्रक पूर्णपणें व्यावहारिक दृष्टीचें आहे. अशा प्रका-रच्या अंदाजपत्रकावरून स्वातंत्र्याच्या काळांत हिंदुलाहि शिक-ण्यासारख्या पुष्कळ गोष्टी आहेत. कर-योजनेनें व सरकारी नियंत्रणांनीं जनतेच्या जास्तींत जास्त घटकांना समाधानी व कार्यप्रवर्तक राखलें आलें पाहिजे.

### खेडेगांवांच्या तोंडाचे रस्ते

चालू वर्षाच्या मुंबई प्रांताच्या अंदाजपत्रकांत ९,६०,००० रुपयांची, खेडेगांवांच्या तोंडाचे रस्ते करण्यासाठी तरतूद केलेली आहे. त्याची वाटणी सरकारनें खालीलप्रमाणें केली आहे:—

| विभाग | रुपये |
|---|---|
| उत्तर | ३,००,००० |
| मध्य | ४,००,००० |
| दक्षिण | २,६०,००० |

### पुण्यांतील बँकांच्या वेळेंत अर्ध्या तासाची कपात

पुणें व पुणें शहर येथील बँकांच्या विनंतीस अनुसरून पुण्याच्या कलेक्टरांनीं पुणें व पुणें शहर ह्यांतील बँकिंगचे तास खालील प्रमाणें ता. ३ मे पासून बदलण्यास संमती दिली आहे:— दररोज बँका १० ते २-३० उघड्या असत, त्या १०-३० ते २-३० उघड्या रहातील. शनिवारच्या कामाच्या वेळा १० ते १ च्या ऐवजी १०-३० ते १ अशा रहातील. म्हणजे, दररोज बँका अर्धा तास उशीरा उघडतील, परंतु पूर्वीच्याच वेळेस बंद होतील.

### संजीवन (नवें पान)

मुंबई सरकारच्या दारूबंदी बोर्डानें वरील नांवाचें सचित्र इंग्रजी मासिक सुरू केलें आहे. दारूबंदी आणि जनतेचा सर्व-साधारण उद्धार ह्यांस तें वाहिलेलें आहे. त्याची वार्षिक वर्गणी ६ रु. असली तरी सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांना तें मोफत मिळूं शकेल. मासिकाच्या सल्लागार संपादक मंडळाचे ना. ल. मा. पाटील हे अध्यक्ष असून प्रो. जे. सी. दारूवाला हे सन्मान्य संपादक आहेत. प्रस्तुत पहिल्या अंकांत श्री. राजगोपालाचारी, श्री. मावळंकर, श्री. ल. मा. पाटील, इत्यादींचे लेख आले आहेत.

## परदेशांतील आर्थिक बातम्या

**इंग्लंडमध्यें मुलांचा काळा बाजार**—इंग्लंडच्या गुप्त पोलिस खात्यानें मुलांचा काळा बाजार करणाऱ्या टोळ्यांचा पत्ता लावला आहे. हा व्यापार करणाऱ्या लोकांच्या मोठमोठ्या शहरांतून कचेऱ्या आहेत. सहा महिन्यापासूनचीं ते सात वर्षांपर्यंतचीं मुलें गरीब, कुमारी मातांच्याकडून विकत घेऊन तीं अमेरिकेंतील अगर इंग्लंडच्या वसाहतींतील अपत्यहीन जोडप्यांना विकण्यांत येतात. ज्या विवाहबाह्य आयांना आपलीं मुलें पोसतां येत नाहींत त्यांच्याकडून तीं घेऊन त्यांना एखाद्या गुप्त ठिकाणीं ठेवण्यांत येतें, आणि सौदा पटला कीं नामधारी आईबाप त्यांचे बरोबर देण्यांत येऊन मुलांची निर्यात करण्यांत येते. एका मुलाला ५० पौंड किंमत व नव्या सुस्थितीच्या घराचें वचन, एवढी किंमत द्यावी लागते.

**बँक ऑफ पाकिस्तान**—पाकिस्तान घटनासमितीच्या मेच्या अधिवेशनांत बँक ऑफ पाकिस्तान स्थापन करण्यासाठी कायद्याचें बिल प्रविष्ट करण्यांत येणार आहे. बँकेचें भांडवल ३ कोटी रुपयांचें असेल. बँकेचा कारभार मुख्यतः सरकारच नियंत्रित करणार असलें तरी ४९ टक्के भांडवल सार्वजनिक विक्रीस काढण्यांत येईल. भागावर चार टक्के नफा देण्यांत येईल. त्यासाठी बँकेला दरवर्षी १२ लाख रुपये लागतील. हिंदुस्थानच्या रिझर्व्ह बँकेचें भांडवल ५ कोटी रुपये आहे. रिझर्व्ह बँक नफा म्हणून २० लाख रुपये वाटते. बँक ऑफ पाकिस्तानची कचेरी, कराचीमधलें सध्याच्या रिझर्व्ह बँकेच्या इमारतींतच तूर्त रहाणार आहे असें समजतें. बँकेच्या स्थापनेच्या कार्याची प्राथमिक तयारी करण्यास प्रारंभ झाला आहे.

**संशोधनासाठी कायदा**—ब्रिटिश सरकारनें देशांतील यांत्रिक संशोधनाला मदत व्हावी म्हणून एक कायदा करण्याचें ठरविलें आहे. सध्या ह्या कायद्याचा मसुदा पार्लमेंटच्या वरिष्ठ सभागृहापुढें आहे. हा कायदा करण्यांत सरकारचे दोन हेतू आहेत. एक असा कीं देशांतील कल्पकतेचा जास्तीत जास्त उपयोग करून घेतां यावा; आणि दुसरा असा कीं लागलेल्या शोधांचा—पेटंट्सचा—उपयोग कांहीं अल्पसंख्य व्यक्तींनाच न होतां सर्व जनतेला व्हावा. एखाद्या पेटंटचा शोध लावण्यापासून शोधकाला काय फायदा होईल हें सांगणें पूर्वी कठीण होतें. पुष्कळदां असें होई कीं कायद्याच्या किचकट बंधनांमुळें पेटंटचा हक्क घेणें शोधकाला परवडत नसे. परदेशांत मात्र अशा एखाद्या शोधाला चांगली किंमत मिळत असे; पण शोध परदेशाला विकला म्हणजे त्याचा उपयोग करून तयार झालेल्या मालासाठी ब्रिटनलाच पैसे द्यावे लागत. अशा परिस्थितींत बरेच वेळां संशोधक आपलें पेटंट आपणाजवळच ठेवीत असत. सध्याच्या कायद्यामुळें ह्या अडचणी नाहींशा होतील अशी ब्रिटिश सरकारची अपेक्षा आहे.

**फिनलंड-रशिआ कराराला मंजुरी**—रशिआ व फिनलंड ह्या दोन देशांत झालेल्या परस्पर साहाय्याच्या कराराला फिनलंडच्या पार्लमेंटनें मंजुरी दिली. कराराला अनकूल १५७ मतें व प्रतिकूल ११ मतें पडलीं.

**पाकिस्तानची कापसाची निर्यात**—रशियानें पाकिस्तानकडून मार्च महिन्यांत १२,५०० टन कापूस विकत घेतला. ब्रिटननें ५,१५० टन, इटलीनें ३,७६९ टन, बेल्जमनें ३,३१६ टन, स्पेननें २,१६१ टन आणि ऑस्ट्रियानें १,७११ टन कापूस विकत घेतला. मार्चमध्यें पाकिस्तानांतून ७ कोटी, ९६ लाख रुपये किंमतीचा कापूस निर्यात झाला.

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

—महाराष्ट्रांतील—
प्रगमनशील व अग्रेसर विमा संस्था
दि औंध म्युच्युअल इन्शूरन्स सोसायटी लि. पुणें २
—आमचीं वैशिष्ट्यें—
(१) काटकसरीचा कारभार (२) खर्चाचें अल्प प्रमाण (३) क्लेम्स तावडतोब पटविणें (४) एजंटास कायमचें व वंशपरंपरागत कमिशन (५) माफक हप्त्याचे दर.
विमा अथवा एजन्सी यासाठी लिहा अगर भेटा.
—मॅनेजिंग डायरेक्टर

दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली
( स्थापना सन १९२७ )
अधिकृत भांडवल ५,००,००० रु.
खपलेलें भांडवल १,५४,३५० रु.
भरलेलें भांडवल ८८,००० रु. चे वर
रिझर्व्ह व इतर फंड १,०७,००० रु. चे वर
खेळतें भांडवल ११,००,००० रु. चे वर
या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागीदारांना योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल इं. कं. लि. कलकत्ता, या कंपन्यांचे विम्यांचे हप्ते स्वीकारले जातात. चेक-हुंड्यांची खरेदीविक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदीविक्री व व्याज वसुली वगैरे
सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार
या बँकेमार्फत केले जातात.
बँकेनें नवीन शेअर्स विक्रीस काढले असून शेअर विक्री चालू आहे. प्रत्येक शेअर रु. ५०/- चा असून अर्जासोबत दर शेअरमागे रु. २५/- ( रु. ५/- प्रिमीयम् म्हणून व रु. २०/- अर्जासोबतचे ) रक्कम भरणेची आहे. उरलेली रु. ३०/- ची रक्कम जरूर लागेल त्यावेळीं रु. १०/- चा. एक या प्रमाणें ३ हप्त्यांनीं वसूल करण्यांत येईल. दोन हप्त्यामधील अंतर ३ महिन्याचेपेक्षा कमी असणार नाहीं. शेअर अर्ज व इतर माहिती पाहिजे असल्यास बँकेचे ऑफिसमध्यें मिळेल.
ना. पां. ठाणेदार
मॅनेजर

## हिंदु धार्मिक विश्वस्त निधींचा उपयोग

### अधिक समाजोपयोगी करण्याचा प्रयत्न

मुंबई प्रांतांतील धार्मिक व धर्मादाय स्वरूपाचे विश्वस्त निधी आणि मिळकती अधिक समाजोपयोगी कसे होऊं शकतील आणि ह्या राष्ट्रीय संपत्तीचा योग्य सार्वजनिक कामासाठी विनियोग कसा करतां येईल ह्याबाबत सूचना करण्यासाठी मुंबई सरकारनें न्यायमूर्ति तेंडोलकर ह्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिति नेमली आहे.

### १०० कोटींचे विश्वस्त निधी

एक हजार रु. अथवा अधिक उत्पन्न असलेले असे सुमारें एक हजार नोंदलेले हिंदु विश्वस्त निधी प्रांतांत आहेत; याहून छोटे विश्वस्त निधी कायद्याप्रमाणें नोंदवावे लागत नाहींत. यांपैकी सुमारें ६५० विश्वस्त निधी मुंबई शहरांत असून त्यांचें सालिना उत्पन्न सुमारें एक कोट रुपये आहे. सर्वसाधारणपणें ३ टक्के व्याजाचा दर लावून या रकमेचें भांडवलांत रूपांतर केलें तर आज ३० कोटी रुपये हिंदु धर्मादाय व धार्मिक विश्वस्त-निधींमध्यें गुंतवलेले आहेत असें म्हणतां येईल. यांत प्रांताच्या ग्रामीण भागांत असलेले विश्वस्त निधी व मिळकती यांची व इतर छोट्या विश्वस्तनिधींची भर घातली म्हणजे मुंबई प्रांतांत एकूण सुमारें शंभर कोटींची रक्कम धर्मादाय व धार्मिक स्वरूपाच्या हिंदु विश्वस्तनिधी व मिळकती यांच्यांत गुंतविलेली आहे, असें निश्चित म्हणतां येईल.

### विश्वस्तनिधीचा विनियोग कसा व्हावा ?

नोंदलेल्या विश्वस्तनिधींतर्फे चालविलीं फक्त मुंबई शहरांतच सुमारें १०० सदावर्तें व अन्नछत्रें आहेत. त्यांचा कारभार योग्य प्रकारें केल्यास मुंबईतील पुष्कळसे लोक मोफत जेवूं शकतील. कासवांना खाऊं घालण्यासाठी मथुरेंत एक विश्वस्त निधी आहे ! आपल्याकडे अनेक विश्वस्तनिधी कुत्र्यांना भाकरी घालणें, मुंग्यांना साखर घालणें किंवा माकडांना खाऊं घालणें अशा कामासाठी आहेत. विश्वस्तनिधींचे असले उद्देश हल्लींच्या काळांत योग्य आहेत असें जनतेला वाटतें कीं काय व या विश्वस्तनिधींचा उपयोग समाजाला हितकारक अशा दुसऱ्या एखाद्या कार्याकडे करणें लोकांना आवडेल कीं नाहीं हें कमिटी पहाणार आहे.

### सायप्रसचें तत्त्व

येथील धर्मादायाबाबतचा कायदा इंग्लंडमधील कायद्यावर आधारलेला असल्यानें धर्मादायबाबतच्या येथील लोकांच्या पुष्कळशा कल्पनांचा त्यांत अंतर्भाव केलेला नाहीं. उदाहरणार्थ धर्मादाय, सत्कर्म, पुण्यदान, सन्मार्ग वगैरेसाठी केलेले विश्वस्तनिधी धर्मादाय स्वरूपाचे नाहींत असें कोर्टानें ठरविलें. लोकांना मान्य होईल असे धर्मादायाच्या व्याख्येंत फेरफार सुचविणें हें कमिटीचें एक काम असून त्याकरितां जनमत अजमाविण्याची तिची इच्छा आहे. तसेंच, विश्वस्तनिधींचीं उद्दिष्टें साधणें अशक्य झालें आहे अशींहि पुष्कळ उदाहरणें आहेत. जरूरीपेक्षा जास्त पैसा कांहीं विश्वस्तनिधींत साठला आहे. अशा सर्व बाबतींत निधींच्या मूळ उद्दिष्टांना जवळच्या असलेल्या अशा इतर उद्दिष्टांसाठी निधी वापरण्याची परवानगी देण्याचे कोर्टाला अधिकार आहेत. हेंच तत्त्व सायप्रसचें तत्त्व म्हणून ओळखलें जातें.

गेल्या कांहीं वर्षांत हायकोर्टानें या तत्त्वाचा व्यापक अर्थ घेऊन विश्वस्तनिधीचा उपयोग उद्दिष्टांस जवळ नसलेल्या अशा समाजोपयोगी कार्यासाठी करण्यासहि मान्यता दिली आहे. ही राष्ट्रीय-संपत्ती असून तिचा सार्वजनिक कामासाठीच उपयोग झाला पाहिजे, असें एक मत आहे. याबाबत जनतेचच मत निर्णायक असल्यामुळें तें समजून घेण्याची समितीला उत्सुकता आहे.


# दि डेक्कन पॉटरीज अँड अलाईड इंडस्ट्रीज, लि.

| अधिकृत भांडवल रु. २०,००,००० (वीस लाख रुपये) | विक्रीस काढलेलें भांडवल रु. ५,००,००० (पांच लाख रुपये) |
|---|---|
| रु. ५० चा एक शेअर याप्रमाणें | रु. ५० चा एक शेअर याप्रमाणें |
| एकूण ४०,००० | एकूण १०,००० |
| ऑर्डिनरी शेअर्समध्यें विभागलें आहे. | ऑर्डिनरी शेअर्समध्यें विभागलें आहे. |

चेअरमन—रावबहादुर गणेश गोपाळ शेंबेकर, जमीनदार, बारामती

फॅक्टरी—चिंचवड, जी. आय्. पी. रेल्वे स्टेशनजवळ

तारेचा पत्ता—'पॉटर्स', पूना

★ मुख्यतः कपबशा, बरण्या, कौलें, फ्लोअरिंग टाइल्स वगैरे नित्योपयोगी मालाच्या उत्पादनासाठी स्थापन झालेला महाराष्ट्रांतील मोठ्या प्रमाणावरील पहिलाच कारखाना.

★ वजनदार, अनुभवी व तज्ज्ञ संचालक मंडळ.

★ पॉटरीतज्ज्ञ मॅनेजिंग एजन्सीचे भागीदार.

कंपनीच्या कपबशा बाजारांत पाडण्याचे शुभमुहूर्तावर.

शेअर वगैरेसाठी कंपनीचे रजिस्टर्ड ऑफिसचे पत्त्यावर पत्रव्यवहार करावा अगर समक्ष भेटावें.

रजिस्टर्ड ऑफिस :
१९१।२९ सदाशिव पेठ, फणसळकर बंगला,
टिळक रोड, पुणें नं. २

मॅ. एजन्टस् :
मेसर्स नॅशनल ट्रेडिंग कंपनी

## ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड, ओगलेवाडी.

**रविवार ता. २५ माहे एप्रिल १९४८ रोजीं ओगलेवाडी येथें भरलेल्या २७ व्या वार्षिक सभेचे वेळीं अध्यक्ष, शेठ चतुरभाई पीतांबरदास शहा यांनीं केलेलें भाषण.**

सभ्य स्त्रीपुरुष हो,

आज आपण या ठिकाणीं एक वर्षानंतर जमलों आहोंत. या मध्यंतरीच्या कालांत परस्परविरोधी अशा दोन गोष्टी घडल्या. आनंदाची गोष्ट म्हणजे हिंदुस्थानला संपूर्ण स्वातंत्र्य मिळालें आणि अत्यंत शोचनीय गोष्ट म्हणजे ज्यांनीं हें स्वातंत्र्य आपल्यास मिळवून दिलें त्या जगत्वंद्य विभूतीचें---महात्मा गांधींचें--- आकस्मिक निधन. या थोर विभूतीच्या निधनामुळें सर्व देश पोरका झाला. देशाचा मोठा आधार नाहींसा झाला. ही हानि कधींही न भरून येण्यासारखी आहे. त्यांचे आत्म्यास परमेश्वर शांती देवो ही मी प्रार्थना करतों.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हिंदुस्थानांतील उद्योगधंद्यांतील उत्पादनांत बरीच वाढ व्हावयास पाहिजे होती. परंतु निरनिराळ्या राजकीय पंथामध्यें असलेल्या मतभेदामुळें कांहीं गटाकडून समाजांत व कामगार-वर्गांत चाललेला अनिष्ट प्रचार आणि जातीय तत्त्वावर झालेल्या हिंदुस्थानच्या फाळणीमुळें उद्भवलेले निरनिराळे प्रश्न यामुळें समाजाची घडी अत्यंत विस्कळीत झाली आहे व सहाजिकच त्याचा उद्योगधंद्यांतील उत्पादनावर अनिष्ट परिणाम होऊन उत्पादनांत दिवसेंदिवस घटच होत आहे.

हिंदुस्थानचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू व उद्योगमंत्री डॉ. श्यामप्रसाद मुकर्जी यांनीं उद्योगधंद्याबाबत सरकारी धोरणासंबंधी जीं नुकतींच वक्तव्यें केलीं तीं वाचून आतां थोडी आशा वाटूं लागली आहे.

या शिवाय आणखी कांहीं गोष्टींचा उद्योगधंद्यावर परिणाम झालेला आहे उदा०—कच्च्या व पक्क्या मालाच्या वाहतुकींतील अडथळे, कच्चा माल व मजुरी यांचेमध्यें झालेली भरमसाठ वाढ यामुळें मालाचे उत्पादनांत वाढ होऊं शकत नाहीं व सहाजिकच तयार मालाचे किंमतीवर त्याचा परिणाम होतो. पण या गोष्टी सरकार, चालक व कामगार यांचे संघटित सहकार्यानें लौकरच सुधारतील अशी आशा बाळगण्यास हरकत नाहीं.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आज उद्योगधंद्यास इतका मोठा वाव मिळाला आहे कीं, उत्पादन करण्यास दिवसाचे चोवीस तासही अपुरे पडतील; परंतु आपल्या मालाची जर जगभर प्रसिद्धि व खप करावयाचा असेल तर आपण आपले तयार मालाचा दर्जा व उत्पादन जास्तींत जास्त वाढविलें पाहिजे व त्या बरोबरच माल कमीत कमी किंमतीस विकण्याचा प्रत्यन केला पाहिजे. या गोष्टीच यापुढें आपले कारखाने उर्जितावस्थेस आणण्यास कारणीभूत होतील. तरी या प्रसंगीं मला कारखान्याचे चालक व कामगार वर्ग यांनीं या दृष्टीनें जास्तीत जास्त प्रयत्न करावा असें अगत्यानें सांगावेसें वाटतें.

यानंतर आपण आपल्या कारखान्याचा १९४७ सालांतील कामकाजासंबंधीचा तपशील पाहूं. या सालीं एकूण मालाची विक्री पावणे-सत्तावीस लाख रुपयांची झाली. वास्तविक मालास असलेल्या मागणीचा विचार करतां विक्रीचा आंकडा बराच मोठा असावयास पाहिजे; परंतु कच्चा मालाचा अपुरा व अनियमित पुरवठा व वहातुकींतील अडचणी यामुळें उत्पादनांत वाढ होऊं शकली नाहीं. या गोष्टी कालांतरानें सुधारतील असें वाटतें.

या सालीं इमारती, माशिनरी वगैरेकरितां अंदाजें सव्वादोन लाख रुपये खर्ची पडलेले आहेत. या सालीं निव्वळ नफा एकूण अंदाजें तीन लक्ष, नऊ हजार रु. झाला. यांतून भागीदारांस इंटेरिम व फायनल मिळून एकूण १४ टक्के डिव्हिडंड द्यावें असें आपल्या डायरेक्टर्सनीं सुचविलेलें आहे; तसेंच तीन महिन्याच्या पगाराइतकी रकम कामगारांना बोनस म्हणून नेहमीच्या शर्तीस अनुसरून देणेचें योजिलें आहे.

राष्ट्रपिते महात्माजींच्या आकस्मिक निधनानंतर महाराष्ट्रांत जी परिस्थिति निर्माण झाली होती, त्यावेळीं चालक, कामगार बंधू, त्यांचे नेते व इतर जवळपासचे सन्माननीय समाज कार्यकर्ते यांचे प्रयत्नानें याठिकाणीं सर्वत्र शांतता नांदली, याबद्दल मी त्यांचे सर्व भागीदारांतर्फे आभार मानतों.

यावेळीं आणखी एक गोष्ट नमूद करावीशी वाटते ती म्हणजे आपल्याकडे असलेल्या दि म्हैसूर ग्लास ॲन्ड एनामल वर्क्स लि., बंगलोरची मॅनेजिंग एजन्सीची मुदत आणखी दहा वर्षांनीं वाढविल्याबाबतचा ठराव त्यांचे नुकत्याच झालेल्या जनरल मिटिंगमध्यें सर्वानुमतें पास झाला. या कंपनीचें काम समाधानकारक चालूं आहे, हें नमूद करण्यास मला आनंद वाटतो.

आपलें दहा लाखाचें अधिकृत भांडवल कारखान्याचे वाढीचे दृष्टीनें आपण नुकतेच पंचवीस लाख रुपये केलें व नवीन वाढविलेल्या पंधरा लाख रुपयांचे भांडवलापैकी दहा लाख रुपयांचे शेअर्स विक्रीस काढलेले आहेत. नवीन वाढविलेलें भांडवल हें प्रत्येक पांच रुपयांचे शेअर्समध्यें आहे. सध्यांचा शेअर्सचा बाजारभाव वगैरेंचा विचार करून शेअरमागें २ रुपये प्रीमियम घ्यावें असें ठरविलें व त्यास हिंदुस्थान सरकारनें परवानगीही दिली. प्रीमियमचे रूपानें जमणारी सर्व रक्कम कंपनीचे रिझर्व्ह फंड म्हणून ठेवली जाते व त्यामुळें कंपनीचे आर्थिक स्थैर्यास मदत होईल.

सर्व साधारणरीत्या सध्यांचें वातावरण अनिश्चित स्वरूपाचें दिसत असलें, तरी भविष्यकाल फारच उज्ज्वल व आशादायक होईल अशी मला आशा असून त्या दिशेनेंच आपल्यास पुढें गेलें पाहिजे.

सभ्य स्त्रीपुरुष हो, मीं आपला बराच वेळ घेतला. आतां सर्वांचे आभार मानून मी आपली रजा घेतों.


**निवडक व उत्कृष्ट मासे**

★ मोठे पॉपलेट्स ★ सुरमाई ★ घोळ
★ दाढा ★ रावस

स्थानिक व बाहेरगांवच्या विक्रेत्यांना व हॉटेलसाठीं लागणारे घाऊक व किरकोळ मासे योग्य भावांत मिळतील.

**फ्रोझन फूड कंपनी**

(१) मुळा रोड, पुणें ३ (२) स्टॉल नं. ४१ कॅन्टोन्मेंट फिश मार्केट, पुणें १

### दि रत्नाकर बँक लि., कोल्हापूर

वरील बँकेचा १९४७ अखेरचा ४ था वार्षिक रिपोर्ट, प्रतिकूल परिस्थितींतहि, किफायतशीर व्यवहाराची प्रगति दर्शवीत आहे. "रिपोर्टाच्या मुदतींत देशांत अनेक महत्त्वाच्या घडामोडी व आंदोलनें झालीं, त्यांतून बँकेनें दक्षतेनें चांगल्या प्रकारें काम चालविलें आहे." १९४३–४४ सालीं बँकेस २१ हजार रु. नफा झाला; १९४४–४५ मध्यें तो आकडा २६ हजारांपर्यंत पोचला; त्यापुढील सालीं तो ४२ हजारांवर गेला आणि अहवालाचे वर्षी तो ५० हजारांचे घरांत गेला आहे. बँकेनें ठेवींवर २६ हजार रुपये व्याज दिलें आणि व्याज, डिस्कौंट, एक्सचेंज, कमिशन, वगैरे रूपानें १ लाख, ३९ हजार रुपये मिळविले. एकूण सुमारें ३१½ लाखांच्या खेळत्या भांडवलापैकी ११ लक्ष रुपये रोख व बँकांत आहेत; म्हणजे चालू खात्यावरील ठेवींची सर्वच रकम पूर्णपणें तरती आहे. हुंडी खरेदी, बिल्स डिस्कौंटेड, इन्व्हेस्टमेंटस, इत्यादि स्वरूपांत सुमारें १० लक्ष रुपये गुंतवलेले आहेत आणि ९½ लाखांचीं कर्जें दिलेलीं आहेत. बँकेनें १९४७ च्या नफ्यांतून १२ हजार रुपये रिझर्व्ह व इतर फंडांत टाकले; ५० रु. भरलेल्या प्रत्येक डिफर्ड शेअरला १६ रु. ८ आ. (करमाफ) डिव्हिडंड देण्यासाठी १,८५२ रु. लागले व ४% (करमाफ) डिव्हिडंड देण्याकडे १२, ३२० रुपयांचा विनियोग केला. श्री. बी. बी. पाटील, बी. ए., एलएल. बी., सांगली, हे बँकेचे चेअरमन असून श्री. गं. सि. चौगुले, व्यापारी व बँकर, शाहुपुरी, कोल्हापूर, हे व्हा. चेअरमन आहेत. श्री. एल. एन. शहा, बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी. हे मॅनेजर आहेत. बँकेची वार्षिक सभा ता. १ मे रोजीं झाली.

---

### श्रीशिवाजी नॅशनल बँक लि., कोल्हापूर

वरील बँकेनें १९४७ सालीं व्याज, डिस्कौंट, कमिशन, वगैरेंचे पोटीं २४,३२४ रु. जमा केले आणि १०,७०६ रु. व्याज देऊन ६,२५६ रु. निवळ नफा मिळविला. बँकेचें वसूल भांडवल ४६,६३० रु. असून ३,४०० रुपयांचे रिझर्व्ह व इतर फंड आहेत. ३,८५,४५९ रुपयांच्या ठेवी आहेत. बँकेनें १,१४,७६८ रु. रोख व इतर बँकांत ठेवले आहेत; ८३,२१९ रुपयांचीं बिलें डिस्कौंट केलीं आहेत आणि २,६३,१२७ रुपयांचीं कर्जें दिलीं आहेत. निवळ नफ्यांतून १,२५० रु. रिझर्व्ह फंडांत टाकण्यांत आले व ३,००० रु. चा विनियोग ६¼% डिव्हिडंड देण्याकडे करण्यांत आला. श्री. द. रा. पाटगांवकर हे बँकेचे चेअरमन असून श्री. नारायणराव हणमंतराव साळोंखे हे मॅ. डायरेक्टर आहेत. बँकेची वार्षिक सभा ता. २३ एप्रिल रोजीं झाली.

---

### मुसलमानांच्या नांवावरील शेअर्सची विक्री : सर्टिफिकेटाची आवश्यकता

बॉंबे स्टॉक एक्सचेंजच्या गव्हर्निंग बोर्डानें नुकताच एक नवा नियम केला आहे. त्याच्या अन्वयें, मुसलमानांच्या नांवावर जे शेअर्स असतील, ते विक्रीच्या पोटीं देतांना त्यांस इन्स्पेक्टिंग असिस्टंट कमिशनर ऑफ इन्कमटॅक्सचें सर्टिफिकेट जोडलेलें असलें पाहिजे. ताज्या प्रॉपर्टी ऑर्डिनन्सखालीं हे शेअर्स जप्त होऊं नयेत, ह्या दृष्टीनें खरेदीदाराचें हित पहाण्यासाठी हा नियम करण्यांत आला आहे. मुसलमानांच्या नांवावरील शेअर्सच्या विक्रीची ऑर्डर दलालास देण्यापूर्वीच, इनकमटॅक्स अधिकाऱ्याचें वरीलप्रमाणें सर्टिफिकेट आणवलेलें असणें श्रेयस्कर आहे.


उन्हाळ्याच्या उष्णतेवर

गु ल कं द

खडीसाखरेचा, प्रवाळयुक्त, व साधा

श्री धूतपापेश्वर पनवेल लि० पुणें डेपो— सिटी पोस्टासमोर.

कृष्णा शुगर मिल्स लि.

कृष्णा–कित्तूर

कन्फेक्शनरी सुरू झाली.

धंद्याच्या वाढीसाठी ठेवी स्वीकारल्या जातात.

६% क्यु. प्रेफरन्स शेअर्स विक्रीस आहेत.

विशेष माहितीसाठी लिहा.

पोस्ट:–कृष्णा–कित्तूर जिल्हा:–बेळगांव.

विंचूरकर ॲण्ड को. मॅनेजिंग एजण्टस्.

नवीन पुष्कळ निघाले, तरी

तुळजाराम मोदी, सातारा

ह्यांचें पुढारीपण कायम आहे.

## अन्नधान्याची उत्पादन वाढ

**हिंदुस्थानांतील अन्नधान्याची परिस्थिति**—चार महिन्यां-पूर्वी कांहीं प्रमुख शहरें सोडून इतरत्र धान्याची नियंत्रण व वाटप-पद्धति बंद करण्यांत आली. तेव्हांपासून निरनिराळया प्रांतांतून आज वेगवेगळी परिस्थिति निर्माण झाली आहे. मुंबई प्रांतांत गेल्या वर्षीपेक्षा पिकें बरीं आहेत; तरी पण धान्याची किंमत नियंत्रित दरापेक्षां २०० टक्के आधिक, वाटपपद्धति नसलेल्या भागांतून, झाली आहे. मद्रास प्रांतांतही किंमती वाढतच चालल्या आहेत. पूर्व पंजाबांत आणि संयुक्त प्रांतांत पिकें चांगलीं असून त्या प्रांतांतील नियंत्रण पुढील महिन्यापासून रद्द होणार आहे. बिहार प्रांतांत फक्त जमशेटपूर येथेंच शिधापद्धति अंमलांत रहाणार आहे. आसाम, ओरिसा व मध्यप्रांत सुपीक असल्यानें त्या प्रांतांतील नियंत्रणें उठलेलींच आहेत. पश्चिम बंगालमधील खरीपाचीं पिकें चांगलीं न आल्यानें व पूर्व पाकिस्तानांतून बरेच निर्वासित आल्यानें, त्या प्रांताची परिस्थिति अडचणींची आहे. मुंबई प्रांताला मध्यवर्ती सरकारकडून ४ लाख, ७५ हजार टन धान्य मिळणार होतें. आतां ही मदत आणखी ७५,००० टनांनीं वाढविण्यांत आली आहे. हिंदुस्थानांतील सुपीक प्रांतांनीं मध्यवर्ती सरकारच्या धान्याच्या गंगाजळीला मदत करण्याचें आश्वासन दिलें आहे. मध्यप्रांताकडून १,५०,००० टन; ओरिसाकडून १,२०,००० टन आणि आसाम-कडून ५०,००० टन धान्य मिळेल अशी अपेक्षा आहे. ऑस्ट्रेलि-आकडून हिंदुस्थानला ७,००,००० टन गहूं मिळणार आहे.

**तांदुळाच्या उत्पादन-वाढीची निकड**—ह्या वर्षी जगांतील तांदुळाचें उत्पादन युद्धपूर्व कालाच्या ९३ टक्के होईल. तथापि तांदुळाची निर्यात मात्र त्या कालाच्या उत्पादनाच्या निमपटीपेक्षा कमीच होणें शक्य आहे. आशिआंतील तांदुळ खाणाऱ्या लोकांचें निकस अन्न आणि गेल्या दहा वर्षांत वाढलेली लोकसंख्या लक्षांत घेतां, तांदुळाच्या उत्पादनांत वाढ करणें जरूरीचें झालें आहे. आशिया खंडाचा अन्नाचा प्रश्न थोड्या अवधींत सुटणारा नाहीं. १९४७ सालीं हिंदुस्थान व अतिपूर्वेकडील देश ह्यांनीं अमेरिका, ऑस्ट्रेलिआ व अर्जेंटायना यांच्याकडून ६५ लक्ष टन अन्नधान्यें आयात केलीं. उलट, युद्धपूर्व काळांत अतिपूर्वेकडून ४५ लाख टन तांदूळ, साखर, गळिताचीं धान्यें व इतर अन्नविषयक माल निर्यात झाला.

**शेणखत गोळा करण्याची योजना**—मुंबईच्या उपनगरांत वाया जाणाऱ्या शेणखताचा उपयोग धान्याच्या उत्पादनासाठी करण्याची एक योजना मुंबई सरकारनें आखली आहे. ह्या योजनेला सुमारें पावणे दोन लाख रुपये खर्च येईल, आणि तिचा फायदा म्हणून २०,००० टन शेणखताचा, भाजीपाला व धान्य ह्यांचें उत्पादन वाढविण्यासाठी उपयोग करतां येईल. योजनेमुळें २,००० टन अधिक धान्य पिकेल असा अंदाज आहे. मुंबई शहर व उपनगरें ह्यांत मिळून ५०,००० गुरें असावींत आणि त्यांच्यापासून दरवर्षी ५०,००० टन शेणखत मिळूं शकेल, असा तर्क आहे.

**उल्हास नदीच्या पाण्याचा नवा उपयोग**—भिवपुरी, जि. कुलाबा येथील टाटाच्या विजेच्या कारखान्यांतून उल्हास नदींत रोज २ कोटी गॅलन पाणी बाहेर पडतें. ह्या पाण्याचा उपयोग शेतीसाठी करण्याची योजना मुंबई सरकार विचारांत घेत आहे. नदीला पाटबंधाऱ्यांची जोड दिली तर उल्हास नदीच्या खोऱ्यांतील ३०,००० एकर जमीन पाण्याखालीं येईल असा अंदाज आहे.

**मिठागरांचा धंदा**—मीठ तयार करण्याचा धंदा मजबूत पायावर उभारण्यासाठी काय करावें ह्याचा विचार करून शिफारसी करण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें तज्ज्ञांची एक कमिटी नेमली आहे. टाटा अँड सन्स कंपनीचे एक अधिकारी श्री. नारळवाला ह्यांची कमिटीच्या अध्यक्षस्थानीं योजना झाली आहे.

विश्वासानें व किफायतशीरपणानें भांडवल
गुंतविण्याचें आदर्श ठिकाण

**पांडुरंग ॲग्रिकल्चरल प्रॉडक्टस लिमिटेड**

हेड ऑफिस व फॅक्टरीः पोस्ट–कुरोली
( व्हाया–कुर्डुवाडी )

कंपनीचें खपलेलें शेअर-भांडवल रु. ४,३७,७००
वसूल शेअर भांडवल रु. ३,२६,५००
कंपनीकडील मुदतीच्या ठेवी रु. २,७०,४००


वाढत्या धंद्यासाठी कंपनी खालील दरानें ठेवी स्वीकारते

★ मुदत वर्षें १, २, ३.
★ व्याजाचा दर द. द. शेकडा ४½, ५, ६.

कंपनीनें पहिल्याच वर्षी १० टक्के ( करमाफ ) डिव्हिडंड दिलें आहे.

अधिक माहितीसाठी आजच वरील पत्त्यावर लिहा.

मॅनेजिंग एजन्टस्:—जे. व्ही. ताम्हनकर आणि कं.



अधिक धान्य पिकविण्याची योजना
—यशस्वी होण्यास—

**किर्लोस्कर पंपिंग सेट्स**

हें अमोघ साधन आहे.
त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

### मुंबई प्रांतामध्यें ८० विणकाम केंद्रें उघडणार

ग्रामोद्योगाच्या पंचवार्षिक योजनेला सरकारनें मान्यता दिली असून या योजनेला एकंदर ९,३६,१२१ रु. खर्च येणार आहे. ही योजना गेल्या वर्षी मान्य झालेल्या योजनेचाच पुढील कार्यक्रम आहे. यांत खादी स्वयंपूर्णता योजनेमध्यें एकंदर ८० विणकाम केंद्रें उघडणें व या केंद्रांतून कार्यकर्त्यांना सूत काढणें, विणणें, कलाकुसरीचीं कामें वगैरे शिकविणें, हे मुख्य कार्यक्रम येतात.

खादी स्वयंपूर्णता योजना कांहीं ठराविक काळ चालू ठेवून त्याचे प्रत्यक्ष परिणाम काय होतात हें पहाणें हा या योजनेमागील हेतु आहे. हीं ८० केंद्रें ग्रामोद्योग समितीनें मान्य केलेल्या संस्थांमार्फत चालविलीं जातील.

ज्या भागांत गरीब सूत काढणाऱ्यांची वस्ती आहे तेथील केंद्रांतून सूतकताईवर विशेष भर दिला जाईल. केंद्रें फार अंतर्गत भागांत असल्यानें सूत कातणाऱ्यांना स्वतःच्या चरितार्थां इतकें काम मिळत नाहीं.

या योजनेप्रमाणें त्यांच्या प्राप्तींत भर पडेल व शिवाय खेड्यांतील कापडाची मागणी स्वयंपूर्ण करून स्वत: बनविलेल्या कापडानेंच भागविण्यावर भर दिला जाईल.

योजनेच्या एक वर्षाच्या कार्यानंतर समितीच्या कार्याचा आढावा घेऊन मदत कमीजास्त करण्याचे बाबतींत सरकार निर्णय घेईल.

---

### हिंदुस्थान व पाकिस्तान ह्यांचेमध्यें सलोख्याची आवश्यकता

( मर्कंटाइल बँक ऑफ इंडिया लि. च्या अध्यक्षांनीं घेतलेला आढावा )

" जुन्या, अखंड हिंदुस्थानाची आर्थिक इमारत फाळणीमुळें कांहीं अंशीं कमकुवत बनली आहे. उदाहरणार्थ, ७५% तागाची लागवड पाकिस्तानांत होते. परंतु तागाच्या सर्व गिरण्या हिंदुस्थानांत आहेत. पाकिस्तानांत फक्त १२% चहा पिकतो, परंतु त्याचा प्रदेश चहाचे मळे व कलकत्ता ह्यांचेमधील दळणवळणाच्या मार्गावर पसरलेला आहे. पश्चिम पाकिस्तानांत गहूं मुबलक पिकतो. लांब धाग्याच्या कपाशीची लागवडहि पश्चिम पाकिस्तानांत केंद्रीभूत झालेली आहे, परंतु गिरण्या हिंदुस्थानांत आहेत. ह्या गोष्टींमुळें हिंदुस्थान व पाकिस्तान ह्यांतील, विशेषत: कलकत्ता येथील व्यापाऱ्यांचे मार्गांत घोटाळे निर्माण झाले आहेत. रेल्वेजची परिस्थिति बिघडल्या कारणानें कोळसा, ताग व चहा ह्यांची वहातुक सुरळीत नाहीं. वास्तविक दोन्ही सरकारांनीं एकत्र येऊन परस्पर व्यापाराबद्दल तडजोड करावयास हवी. परंतु त्याऐवजी फेब्रुवारीच्या अखेरीस हे दोन्ही देश परराष्ट्रें बनलीं आणि त्यांनीं एकमेकाच्या मालावर आयात व निर्गत जकाती लादल्या. त्यामुळें दोघांनाहि त्यांच्या वसुलीचा खर्च व त्रास सोसावा लागत आहे. व्यापाराचे दृष्टीनें ही परिस्थिति अत्यंत प्रतिकूल व असमाधानकारक आहे. "

---

**कापडाच्या धंद्यासाठी संशोधन केंद्र**— कापडाच्या धंद्याचें कोईमतूर हें हिंदुस्थानांतील एक प्रमुख केंद्र आहे. कापडाच्या धंद्यासंबंधीं कोईमतूर येथें एक संशोधन केंद्र उघडण्याविषयीं हिंदुस्थान सरकारचे उद्योगमंत्री डॉ. मुकर्जी आणि मद्रासचे मुख्य प्रधान ह्यांच्यांत नुकतीच चर्चा झाली.


## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



दि

## बँक ऑफ इंडिया, लि.

**स्थापना १९०६**

खपलेलें भांडवल :- ३,००,००,०००.
वसूल झालेलें भांडवल :- १,५०,००,०००.
राखीव फंड :- २,००,००,०००.
मुख्य कचेरी :-ओरिएंटल बिल्डिंग्ज, मुंबई.

**इतर शाखा** :- मुंबई:- बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबा देवी व मलबार हिल. मुंबई नजीक:-बांद्रें व अंधेरी. अहमदाबाद:-भद्र ( मुख्य शाखा), इलिस ब्रिज, माणिक चौक व स्टेशन शाखा. कलकत्ता :-क्लाइव्ह स्ट्रीट ( मुख्य शाखा ), बडा बाजार व चौरंघी स्क्वेअर. नागपूर:-किंग्ज वे व इतवारी बाजार. पुणें:-लष्कर व शहर. मद्रास, कोईमतूर, कालिकत, अमृतसर, भुज (कच्छ), जमशेटपूर, जुनागड, कराची, पालनपूर, राजकोट, सुरत, सोलापूर, वेरावल.

**लंडन शाखा** :- १७ मूरगेट, लंडन ई. सी. २.

**न्यूयॉर्क एजंट्स** :-दि चेस नॅशनल बँक ऑफ दि सिटी ऑफ न्यूयॉर्क.

**डायरेक्टर्स** :-सर कासवजी जहांगीर, बॅरोनेट, जी. बी. इ., के. सी. आय. इ. चेअरमन; श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाइट, मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण, ना. सर शांतिदास अस्करन, नाइट, मि. महंमद सुलेमान कासम मिठा, सर किकाभाई प्रेमचंद, नाइट, श्री. भगवानदास सी. मेहता, श्री. कृष्णराज एम. डी. ठाकरसी.

चालू ठेवींचें खातें:—कांहीं ठिकाणें सोडून रोजच्या रु. ३०० ते रु १ लक्ष पर्यंतच्या शिलकेवर दरसाल द. शें. एकचतुर्थांश रु. व्याज देण्यांत येतें. रु. १ लाखाहून जास्त शिलकेवर खास योजनेनें व्याज दिलें जातें. सहामाही व्याज रु. ५ पेक्षा कमी झाल्यास तें दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग्ज बँक ठेवी योग्य अटीवर स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें. विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

**बी. एन्. अटल**, एजंट, पुणें










हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.